# **१०. १९४५ नंतरचे जग - II**

**प्र. १ दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून पुढील विधाने पूर्ण करा :**
(१) १९६१ मध्ये **क्यूबा** या देशात क्षेपणास्त्र पेचप्रसंग उद्भवला.
(२) अरब-इस्राएल वाद सोडवण्यासाठी १९७८ मध्ये अमेरिकेने **कॅम्प डेव्हिड** येथे शिखर परिषद आयोजित केली.

ब) चुकीची जोडी दुरुस्त करून पुन्हा लिहा :

(१) ईरान – आयातोल्ला खोमेनी
(२) अफगाणिस्तान – बाबाक कारमाल
(३) सोव्हिएट रशिया - रिचर्ड निक्सन
**उत्तर : दुरुस्त जोडी :**
**(३) सोव्हिएट रशिया - लिओनिड ब्रेझनेव्ह.**

**क ) दिलेल्या विधानांसाठी समर्पक संकल्पना लिहा :**
(१) जहाजांना बंदरात अथवा देशात प्रवेश करण्यापासून रोखणे – **(उत्तर :सागरी नाकेबंधी )**
(२) सोव्हिएट रशियाच्या प्रस्थापित राजकीय व आर्थिक व्यवस्थेची - **(उत्तर : पेरेस्त्रॉइका )**

**प्र.२ 'आजचा पूर्व युरोप' या नकाशाचे निरीक्षण करून पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा**
**(१) सोव्हिएट रशियाच्या विघटनानंतर अस्तित्वात आलेले स्वतंत्र देश कोणते ?**
**उत्तर :** (१) यूक्रेन (२) बेलारूस (३) लुटिया (४) लिथुआनिया.

**(२) हंगेरीच्या शेजारील दोन राष्ट्र कोणती?**
**उत्तर :** (१) ऑस्ट्रिया (२) स्लोवाकिया.

प्र.३ पुढील विधाने चूक की बरोबर ते सकारण स्पष्ट करा :
(१) अलिप्ततावादी देशांनी नाफ्टाची (NAFTA) स्थापना केली.
उत्तर : हे विधान चूक आहे.
कारण : North American Free Trade Agreement - NAFTA ची स्थापना अमेरिका, कॅनडा व मेक्सिको या देशांनी केली.

(२) पं. जवाहरलाल नेहरू हे 'आसियन'चे संस्थापक होते.
उत्तर : हे विधान चूक आहे.

कारण : पं. जवाहरलाल नेहरू अलिप्ततावादी चळवळीचे संस्थापक होते.

प्र. ४ सहसंबंध स्पष्ट करा :
(१) शीतयुद्ध आणि अलिप्ततावादी चळवळ.
उत्तर : (१) दुसऱ्या महायुद्धानंतर उद्भवलेल्या शीतयुद्धामुळे जगाची भांडवलशाही गट आणि साम्यवादी गट यांत विभागणी झाली होती.
(२) भारतासारख्या अलिप्ततावादाचा पुरस्कार करणाऱ्या देशांना शीतयुद्धाची तीव्रता कमी करण्याची आणि जागतिक शांतता टिकवण्याची आवश्यकता वाटत होती.
(३) त्यामुळे अलिप्ततावादाचा पुरस्कार करणाऱ्या देशांनी १९६१ साली अलिप्ततावादी चळवळ स्थापन केली.

प्र.५ पुढील प्रश्नांची उत्तरे थोडक्यात लिहा

(१) 'नवीन शीतयुद्ध' ही संकल्पना स्पष्ट करा.
उत्तर : (१) सन १९७९ ते १९८५ या कालखंडातील अमेरिका व सोव्हिएट रशिया यांच्यातील तणावपूर्ण संबंधास 'नवीन शीतयुद्ध' असे म्हणतात.
(२) सोव्हिएट रशियाने १९७९ साली अफगाणिस्तान या देशावर नियंत्रण मिळवले. अफगाणिस्तान हा समाजवादी देश म्हणून उदयास' आला. या देशाबरोबर सोव्हिएट रशियाने घनिष्ठ लष्करी करार केले.
(३) इराणमध्ये आयातोल्ला खोमेनी यांनी इस्लामिक राज्याची स्थापना केली. इराणने अमेरिकेशी केलेले सर्व करार रद्द केले आणि CENTO या लष्करी गटातून बाहेर पडण्याचा निर्णय घेतला.

(२) 'व्यापार गट' म्हणजे काय?
उत्तर : (१) विशिष्ट भौगोलिक क्षेत्रातील आर्थिक समस्यांचे निराकरण करण्यासाठी आणि आर्थिक समन्वय साधण्यासाठी ज्या संघटना स्थापन करण्यात आल्या त्यांना व्यापार गट असे म्हणतात.
(२) या संघटनांनी व्यापारवृद्धीवर लक्ष केंद्रित केले. त्यासाठी सीमा शुल्क सारखे अडथळे दूर केले. त्यांनी मुक्त व्यापाराचे करार केले.
(३) कॅनडा, अमेरिका व मेक्सिको या देशांनी NAFTA हा व्यापार गट स्थापन केला.

प्र. ६ आपले मत नोंदवा.
१) शीतयुद्धाच्या काळात भारताने महत्त्वाची भूमिका बजावली.
उत्तर : (१) स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारताने अलिप्ततेच्या धोरणाचा स्वीकार केला.
(२) १९४७ साली पहिली आशियायी परिषद आणि १९५५ साली पहिली आफ्रो-आशियन परिषदेच्या आयोजनात भारताने महत्वपूर्ण भूमिका पार पाडली. या परिषदांत जागतिक शांतता व सुरक्षितता राखण्यात नव-स्वतंत्र देशांनी अलिप्ततेचे धोरण स्वीकारावे असे प्रतिपादन भारताचे प्रधानमंत्री पं. जवाहरलाल नेहरू यांनी केले.
(३) १९६१ साली समविचारी राष्ट्रांच्या सहकार्याने अलिप्त राष्ट्रांची चळवळ स्थापन करण्यात भारताने पुढाकार घेतला.

(४) दोन महासत्तांत सत्ता-संघर्ष चालू असताना, भारताने जागतिक शांतता व सुरक्षिततेसाठी विशेष प्रयत्न केले.
(५) क्यूबातील पेचप्रसंगाच्या वेळी भारत व अलिप्ततावादी देशांनी महासत्ता वर दबाव आणून संभाव्य अणुयुद्धाचा धोका टाळला.
(६) जागतिक शांततेच्या धोरणाचा पुरस्कार भारताने संयुक्त राष्ट्रांत केला. कोरिया, गाझा पट्टी, कोंगो या संघर्ष ग्रस्त राष्ट्रांत शांतता प्रस्थापित करण्यासाठी संयुक्त राष्ट्रांच्या मार्गदर्शनाखाली भारताने सैन्यदले पाठवली. अशा प्रकारे शीतयुद्धाच्या कालखंडात भारताने महत्त्वाची भूमिका बजावली.

**प्र. ७ दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे पुढील प्रश्नाचे सविस्तर उत्तर लिहा: (प्रत्येकी १२ गुण)**
**(१) देतांत पर्व विशद करा.**
**[मुद्दे : (अ) अर्थ (ब) तणाव कमी करण्यासाठी महासत्तांनी केलेले प्रयत्न]**
**उत्तर : (अ) देतांतचा अर्थ :** शीतयुद्धामुळे महासत्तांत उदभवलेला ताणतणाव कमी करण्याचे प्रयत्न १९६० च्या दशकात सुरू झाले. ताणतणाव कमी करण्याच्या या प्रक्रियेला आंतरराष्ट्रीय राजकारणात देतांत असे म्हणतात.
**(ब) ताणतणाव कमी करण्याचे प्रयत्न :** क्यूबामधील पेचप्रसंगाने (१९६१) सोव्हिएट रशिया व अमेरिकेस अणुयुद्धाच्या शक्यतेची जाणीव करून दिली. अमेरिकेचे मित्रराष्ट्र असलेल्या युनायटेड किंग्डम व फ्रान्स आणि अलिप्ततावादी चळवळीचे नेतृत्व
करणाऱ्या भारत व युगोस्लाव्हिया या देशांच्या नेत्यांनी ताणतणाव कमी करण्याचा दबाव महासत्तांवर आणला. सोव्हिएट रशियाने क्यूबामधून क्षेपणास्त्रे काढून घेतल्याने परिस्थिती निवळली. त्यानंतरच्या कालखंडात म्हणजे १९६२ पासून महासत्तांनी ताणतणाव जाणीवपूर्वक कमी करण्याचे प्रयत्न केले. त्यांचे संक्षिप्त विवरण पुढीलप्रमाणे :
(१) सोव्हिएट रशिया व अमेरिका या दोन महासत्तांनी
आणीबाणी - संघर्षात्मक परिस्थितीत एकमेकांशी संवाद साधता यावा यासाठी दूरध्वनीची 'HOT LINE' तयार केली.
(२) अण्वस्त्रे कमी करण्याचे करार करण्यात आले.
(३) १९७२ मध्ये अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष रिचर्ड निक्सन यांनी सोव्हिएट रशियाच्या साम्यवादी पक्षाचे महासचिव लिओनिड ब्रेझनेव्ह यांची मॉस्को येथे भेट घेतली. मॉस्को शिखर संमेलनात अण्वस्त्रांच्या संख्येवर मर्यादा घालणारा करार उभयतांनी केला.
(४) १९७२ मध्ये अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष रिचर्ड निक्सन यांनी चीनचे राष्ट्राध्यक्ष माओ झेडाँग यांची बिजिंग येथे भेट घेतली. अमेरिकेने चीनच्या साम्यवादी राजवटीस मान्यता दिली.
(५) १९७३ मध्ये पॅरिस परिषदेत व्हिएतनाममधील युद्ध थांबवण्याचे प्रयत्न करण्यात आले.
(६) १९७५ मध्ये 'अपोलो-सोयुझ' यान का अमेरिका व सोव्हिएट रशियाने संयुक्तपणे अंतरिक्षात उड्डाण केले.
(७) १९७५ मध्ये हेलसिंकी परिषदेत पूर्व युरोप आणि पश्चिम युरोप यांतील तणाव कमी करण्याच्या विषयाची अमेरिका, सोव्हिएट रशिया व ३५ युरोपियन राष्ट्रांनी चर्चा केली.
(८) १९७८ मध्ये अमेरिकेतील कॅम्प डेव्हिड येथे शिखर परिषदेचे आयोजन राष्ट्राध्यक्ष कार्टर यांनी केले. इजिप्तचे अध्यक्ष अन्वर-अल सादात आणि इस्त्राएलचे प्रधानमंत्री मेनॅकन बेगिन यांनी मध्य पूर्वेतील देशांसाठी शांततेच्या संरचना करारावर स्वाक्षरी केली.
(९) देतांतच्या या प्रक्रियेत १९७९ ते १९८५ या कालखंडात व्यत्यय आला. मात्र १९८५ साली मिखाईल

गोर्बाचेव्ह सत्तेवर आल्यानंतर ही प्रक्रिया पुन्हा सुरू झाली.
(१०) गोर्बाचेव्ह यांच्या नवीन परराष्ट्र धोरणाने आंतरराष्ट्रीय तणाव कमी करण्यास साहाय्य केले.
(११) १९८९ मध्ये पूर्व युरोपात साम्यवादी सरकारविरुद्ध उठाव घडून येत असताना, सोव्हिएट रशियाने त्यात हस्तक्षेप केला नाही.
(१२) १९९० साली पूर्व आणि पश्चिम जर्मनीचे एकत्रीकरण घडून आले.
(१३) २५ डिसेंबर १९९१ रोजी गोर्बाचेव्ह यांनी सत्तात्याग केल्यानंतर सोव्हिएट रशियाचे विघटन घडून आले आणि १९४५ सालापासून सुरू झालेले शीतयुद्ध समाप्त झाले.